# वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव किर्लोस्करवाडीत सुरु



किर्लोस्करवाडी येथे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे उद्घाटन प्रियदर्शिनी कर्वे यांच्याहस्ते झाले.

किर्लोस्करवाडी : किर्लोस्कर ब्रदर्स लिमिटेड व क्लब वसुंधरा यांच्या विद्यमाने आज (सोमवार) किर्लोस्करवाडी येथे किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवास प्रारंभ झाला. हा महोत्सव नागरिकांसाठी मोफत असून प्रतिनिधी नोंदणीला प्रतिसाद मिळत आहे, अशी माहिती वसुंधरा चित्रपट महोत्सवाचे अध्यक्ष रवी सिन्हा (उपाध्यक्ष, कार्पोरेट एचआर एम व सी), प्रकाश पुदाले, सुभाष पाटील व डॉ. राजन कामत, विजय शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

महोत्सवाचे उद्घाटन आज सायंकाळी साडेपाच वाजता सोशल क्लब येथे डॉ. प्रियदर्शिनी कर्वे व प्रकाश पुदाले यांच्याहस्ते झाले. यावर्षी किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय महोत्सवाचा संदेश 'एस. आर.' असा आहे. तत्पूर्वीछायाचित्र प्रदर्शनाचेही उद्घाटन झाले. पाचव्यांदा होत असलेल्या या महोत्सवाचे यजमानपद किर्लोस्कर उद्योग समूहाने स्वीकारले आहे. दुपारी २ ते ४ या वेळेत डॉ. प्रियदर्शिनी कर्वे यांचे भारती पॉलिटेक्निक कॉलेज पलूस येथे एस आर या विषयावर चित्रपट दर्शन व विद्यार्थ्यांसाठी लघुपटाचे आयोजन करण्यात आले आहे

माहिती देताना सिन्हा म्हणाले की, दि. १६ रोजी सकाळी पर्यावरण सायकल फेरीचा प्रारंभ येथील सोशल क्लब येथून होणार आहे. दुपारी ११ ते २ या वेळेत ए. एस. सी. कॉलेज, पलूस येथे विद्यार्थ्यांना चित्रपट, तर सायंकाळी सोशल क्लब किर्लोस्करवाडी येथे ६ ते ८ या वेळेत नागरिकांसाठी विविध लघुपट दाखविण्यात येणार आहेत.

दि. १७ रोजी सकाळी कुंडल येथे फॉरेस्ट अॅकॅडमीला किर्लोस्कर हायस्कूलचे विद्यार्थी भेट देणार आहेत. सकाळी ११ ते २ या वेळेत ए. एस. सी. कॉलेज रामानंदनगर येथे लघुपट, दुपारी २ ते ५ या वेळेत दुधोंडी येथे शिवाजी विद्यालय व पलूस येथील वि. दि. पलूसकर हायस्कूल येथे जलदिंडी आयोजित करण्यात आली आहे. अरुण सावंत (सावंतपूर) व अशोक लकडे (सांगली) यांना वसुंधरा मित्र तर विश्वंभर चौधरी यांना वसुंधरा सन्मान पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. सायंकाळी साडेपाच वाजता महोत्सवाची सांगता होणार आहे. (वार्ताहर)